मा. प्रशासक
पुणे महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:०९/०५/२०२५

पुणे महानगरपालिका
स्थायी समिति
दाखल कार्यपत्रिका

विषय क्र.९५त्वर्य

प्र.क्र.३३ वडगाव बु।।, स.नं.५७ पार्ट महिला बचत गट केंद्र, स्व. सुषमा स्वराज बचत गट आणि प्रशिक्षण केंद्र येथील पहिला व दुसरा मजला (क्षेत्रफळ ५१२.०० चौ.मी.) या वास्तूमध्ये पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग व क्रांतीज्योती महिला प्रतिष्ठान, धायरी, पुणे या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उपक्रम राबविणे करिता खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/९६, दि.०७/०५/२०२५ चे पत्र.

१. प्र.क्र.३३ वडगाव बु।।, स.नं. ५७ पार्ट महिला बचत गट केंद्र, स्व. सुषमा स्वराज बचत गट आणि प्रशिक्षण केंद्र येथील पहिला व दुसरा मजला (क्षेत्रफळ ५१२.०० चौ.मी.) या वास्तूमध्ये समाज विकास विभाग व क्रांतीज्योत महिला प्रतिष्ठान, धायरी, पुणे या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उपकम १० वर्ष कालावधीकरीता राबविणेस, क्रांतीज्योत महिला प्रतिष्ठान, धायरी, पुणे या संस्थेसमवेत करारनामा करणेस.

२. पुणे महानगरपालिकेमार्फत सदर जागेपोटी निश्चित निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कम रू. १५२३५ /-भाडे दरमहा भरून घेणेस व तीन महिनेच्या भाडे रक्कमे इतकी रक्कम अनामत रक्कम म्हणून घेणेस. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका नियम २०२३ चे अनुषंगाने भाडे पट्ट्याच्या रक्कमेत दर तीन वर्षांनी सुधारणा करून वर्तमान वार्षिक भाडेपट्याची रक्कम पाच टक्क्यांनी वाढविणेस व त्या प्रमाणात सुरक्षा अनामत रक्कमेत वाढ करणेस.

३. पुणे महानगरपालिका मिळकत/जागा वाटप नियमावली सन २००८ मधील भाग १० (२३) मधील २ नुसार व्यवस्थापन व देखभाल यावरील येणारा खर्च भागविण्यासाठी योग्य ते शुल्क मा. महापालिका आयुक्त यांचे पुर्व परवानगीने संस्थेमार्फत आकारणेस.

४. क्रांतीज्योत महिला प्रतिष्ठान, धायरी, पुणे या संस्थेमार्फत विषयांकित वास्तूचे संपुर्ण व्यवस्थापन, दुरूस्ती विषयक कामे करणेस.

५. समाज विकास विभागास आवश्यकता असल्यास सदर वास्तू वापरण्यास देणेस.

६. प्रकल्पासाठी आवश्यक असलेले फर्निचर व्यवस्था, तद्नुषंगिक साधन-सामुग्री, प्रशिक्षित मनुष्यबळ इत्यादी बाबी क्रांतीज्योत महिला प्रतिष्ठान, धायरी, पुणे या संस्थेमार्फत पुरविणेस.

७. सदर ठिकाणी प्रकाश व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करणे, सदर मिळकतीची किरकोळ देखभाल दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी व कोणत्याही प्रकारची देयक जसे की विज देयक अथवा इतर तत्सम देयक क्रांतीज्योत महिला प्रतिष्ठान, धायरी, पुणे या संस्थेकडून करणेस.

८. क्रांतीज्योत महिला प्रतिष्ठान, धायरी, पुणे या संस्थेमार्फत पुणे मनपाकडे करार संपेपर्यंत वार्षिक संयुक्त प्रकल्प अहवाल प्रत्येक वर्षी समाज विकास विभागाकडे सादर करणेस.

९. सदर प्रकल्प राबविताना काही अनुचित प्रकार, घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी क्रांतीज्योत महिला प्रतिष्ठान, धायरी, पुणे या संस्थेची राहणेस.

१०. क्रांतीज्योत महिला प्रतिष्ठान, धायरी, पुणे या संस्थेने व्यवस्थित व समाधानकारक काम केले नाही तर संस्थेकडील जागा काढून घेणेस.

विषय क्र.९६त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या येरवडा हॉट मिक्स प्लांट करिता डांबरी (व्ही.जी. 30/40 ग्रेड), एल. डी. ओ. इमल्शन आर. एस.-I. आर. एस.-II महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) (क) अन्वये र.रु.२,४१,४७,८११/- अधिक GST इतक्या रककमेची डांबर खरेदी ठेकेदार मे. शिवम ग्रीन यांच्या कडून अपवादात्मक परिस्थितीत करून

घेण्यात आल्याने त्यास मान्यता मिळणेस व र.रु.२,४१,४७,८११/- अधिक GST इतक्या रक्कमेचे प्रदान ठेकेदार मे. शिवम ग्रीन एनर्जी यांना करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/९८, दि.०८/०५/२०२५ चे पत्र.

विषय क्र.९७त्वर्य

Selection of Contractor for Mechanical Sweeping of Main Roads in Zone 1 of Pune city using Truck Mounted Road Sweepers for Seven Years कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. BVG India Limited यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४०,८५,८२,७२०/- पेक्षा ५.७५ % ने जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.४३,२०,७६,२२६=४ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४३,२०,७६,२२६=४ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/१००, दि.०९/०५/२०२५ चे पत्र.

विषय क्र.९८त्वर्य

डीबीओटी तत्त्वावर अ) शिवणे ते म्हात्रे पूल (फेज-१) व ब) संगमवाडी ते खराडी (फेज-3) नदीकाठचा डीपी रस्ता डिफर्ड पेमेंट पद्धतीने विकसित करणे या कामामधील ठेकेदार यांनी दाखल केलेल्या नुकसान भरपाई दावा प्रकरणी ठेकेदार में पटेल इंजिनिअरिंग लिमिटेड यांचे समवेत करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१०१, दि.०९/०५/२०२५ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका